# स्नेहबंध

मार्च २०१८

मराठी भाषिक मंडळ, टोरांटो

MARATHI BHASHIK MANDAL TORONTO

# अध्यक्षांचे मनोगत

नमस्कार मंडळी

नवीन वर्षात तुम्हा सर्वांचे पुन्हा एकदा स्वागत. मराठी भाषिक मंडळ ही संस्था गेली ५० वर्षे आपल्या मंडळाचे जे काही कार्य करत आहे , त्यात तुम्हा सर्वांचा  मोलाचा सहभाग आहे. आपल्यामध्ये असलेला समान दुवा म्हणजे आपली मराठी भाषा. आपली भाषा ही आपल्या मंडळाच्या उद्दिष्टांच्या केंद्रस्थानी आहे. तिचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी मंडळ वेगवेगळे उपक्रम राबवत असते. अशा उपक्रमांपैकीच एक म्हणजे 'स्नेहबंध'. मधे काही कारणास्तव खंडित झालेले हे त्रैमासिक आम्ही पुनश्च सुरू करीत आहोत. मंडळाच्या वतीने मी आपण सर्वांना विनंती करतो की ह्या उपक्रमाला आपण भरभरून प्रतिसाद द्यावा आणि आपल्या माय-मराठीचा प्रसार सुरु ठेवावा.

कळावे, लोभ असावा.

आपला

यतिन पाटील
अध्यक्ष, मराठी भाषिक मंडळ, टोरोंटो



## पालवी– संपादकिय

चैत्र शुद्ध प्रतिपदा ... गुढी पाडवा... नवीन वर्ष ... नवीन वर्षात पदार्पण करताना स्नेहबंधाचा हा अंक (फार दिवसांनी नव्हे तर फार वर्षांनी म्हणा हवे तर) घेऊन आपल्यासमोर आम्ही येत आहोत. श्री. यतिन पाटील यांच्या तरुण नेतृत्वाच्या खाली काम करण्यास सिद्ध झालेली EC Commitee आणि टोरांटो मधल्या महाराष्ट्र मंडळाची भिस्त ज्यांनी अनेक वर्षे संभाळली अशी AC Commitee… नवीन वर्ष,नव्या कल्पना, नवे संकल्प, नवी उभारी, नवी पालवी.

हा या वर्षीचा पहिला अंक काढताना मनात अनेक शंका-कुशंका आल्या नसत्या तर नवलच... बदलत्या सामाजिक जाणिवा, मंडळाची सर्वांना एकत्र आणण्याची तयारी, तत्परता आणि गरज या बरोबरच स्नेहबंध सारख्या काही काळ लुप्त झालेल्या उपक्रमांचे पुनरुज्जीवन करण्याची आवश्यकता . अनेक प्रश्न अनेक शंका ...

पण.... कुठेतरी पुन्हा सुरुवात व्हायला हवी.. वठलेल्या, हिवाळ्याच्या जोराने निष्पर्ण झालेल्या झाडांना नवीन धुमारी फुटायलाच हवी... आणि म्हणूनच स्नेहबंधाच्या या अंकाचा प्रपंच ....

झालं.... ई पत्रामधून एकदा दोनदा साहित्याची मागणी करण्याचं आवाहन केलं गेलं ....  त्याला पहिले काही दिवस कुणीच प्रतिसाद दिला नाही .... काव्य, शास्त्र, विनोद, नाटक, संगीत आणि राजकारण हे मराठी माणसाचे आवडते छंद ....मन एकदम खट्टू झालं ....  काही काळाने हळूहळू नवीन पालवी फुटू लागली... थोडेफार साहित्य गोळा होऊ लागले ... अंक आकार घेऊ लागला...

तुम्ही म्हणाल हा अंक अगदीच संक्षिप्त आहे (अगदी १०-१५ पानेच)... पण ही तर सुरुवात आहे राव! मला आशा आहे नव्हे खात्रीच आहे म्हणा ना, हा अंक अनेकांच्या मनात नवी उभारी, नवी साहित्यिक पालवी फोडल्याशिवाय राहणार नाही... पुढच्या अंकासाठी भरपूर साहित्य, लेख, कविता, कोडी, लघुलेख, दीर्घलेख, नाट्यप्रवेश इत्यादि आवडते साहित्यप्रकार घेऊन टोरांटो मधली मराठी भाषिक मंडळी आपली साहित्यिक अस्मिता जपतील....


सगळ्यात शेवटी पण महत्वाची गोष्ट.... अहो सगळी सोंगे आणता येतात पण पैशाचे सोंग आणता येत नाही..अजूनही माझ्यासारख्या अनेक माणसांना अंक, वर्तमानपत्र, पुस्तक आणि कविता संग्रह हे छापील स्वरूपातच वाचायला आवडतात.. पण छपाईचा खर्च Advertisers and sponsors शिवाय कुठून आणणार? मराठी  मंडळाच्या संबंधित असणाऱ्या सर्व व्यावसायिकांना आणि मराठी मंडळाच्या शुभेच्छू मान्यवरांना कळकळीची विनंती करतो की आपण आर्थिक सहाय्य केलेत तर छापील अंक काढणेही नक्कीच शक्य होईल ...

या वर्षी अजून २-३ अंक काढण्याचा मानस आहे... हा अंक आपल्याला कसा वाटला? आम्हाला जरूर कळवा ... Facebook, Watsapp आणि  other social media तर्फे सगळ्यांना पाठवा ...... अगदी भारतातच नव्हे तर जगातल्या सगळ्या काना-कोपऱ्यात जिथे जिथे मराठी माणसें आहेत तिथे तिथे पोचवा आणि अभिमानाने सांगा की टोरांटो मराठी भाषिक मंडळ पुन्हा एकदा नव्या जोमाने स्नेहबंध (प्रेमाचा धागाच तो) घेऊन सर्वांपुढे येत आहे..

शेवटी असे उपक्रम आपण सर्वांनीच उचलून धरायला हवेत, नाही का?

--- **संपादक**

दत्तगुरू (६४७-२९६-८०४४)





## स्नेहांकित

नमस्कार मंडळी...

कार्यकारी समिती आणि सल्लागार समिती २०१८ (EC & AC २०१८) स्नेहबंध च्या पहिल्या वाहिल्या आवृत्ती मध्ये आपले स्वागत करत आहे.

पहिल्या त्रैमासिकात (Jan - March '१८), आपण 'आपला मानूस' आणि 'गुलाबजाम' सारखे अतिशय लोकप्रिय आणि दर्जेदार नवीन मराठी चित्रपट पाहिले; Karaoke Musical Night ची मजा लुटली; Valentines Day ला आपल्या तरुण मंडळींनी अगदी colourful event अनुभवला. आता लवकरच साहित्य-प्रेमी रसिकांसाठी आपण 'साहित्य संमेलन' आयोजित करत आहोत. आपणा सर्व रसिकांचा ह्या सर्व कार्यक्रमांना मिळालेला अभूतपूर्व प्रतिसाद पाहून आमचा उत्साह दुणावला आहे.

दरवर्षी प्रमाणे होळी, वासंतिक, गणपती, दिवाळी ह्या मुख्य कार्यक्रमांसाठी आम्ही अशाच सुंदर आणि आनंद-दायी कार्यक्रमांची पर्वणीच घेऊन येत आहोत. त्याचप्रमाणे karaoke nights, social meet ups सारखे मधले प्रोग्रॅम्स तर आहेतच. आपला असाच भरघोस प्रतिसाद आणि सक्रिय पाठिंबा अपेक्षित आहे. आपल्या कार्यक्रमांना Volunteering, Sponsorship, Membership, Participation in programs अशा विविध तऱ्हेने आपले सहकार्य देऊ शकता.

तर मंडळी, Stay tuned to our E –Patra & Facebook announcements.

EC & AC Members - 2018

## जाहीर आवाहन

**Sponsorhsip / Advertisemts**

स्नेहबंध चा हा उपक्रम अव्याहतपणे पुढे चालू ठेवण्यासाठी आर्थिक पाठबळाची नितांत गरज आहे. मराठी भाषिक मंडळाच्या सर्व रसिक वाचक मंडळींना आम्ही आवाहन करत आहोत की आपण स्वतः आणि आपल्या आजूबाजूला असणाऱ्या आपल्या मित्रमंडळींनी sponsorship / advertisements द्वारा आर्थिक सहकार्य करून ह्या उपक्रमाला सक्रिय हातभार लावावा.

**Volunteering**

स्नेहबंधच्या प्रत्येक अंकासाठी आर्थिक पाठबळाप्रमाणे मनुष्यबळाचीही आवश्यकता आहे. ज्यांना typing, proof reading आणि इतरही अनेक प्रकारची कामे करण्याची इच्छा असेल त्यांचे हार्दिक स्वागत आहे. त्यांनी आपली नावे आमच्याकडे द्यावीत. पुढील अंकाच्या वेळी आपल्याला संपर्क केला जाईल.

ह्या मासिकात प्रकाशित झालेल्या कोणत्याही लेख अथवा कवितेतील आशयाशी संपादक आणि MBM (EC & AC) सहमत असतीलच असे नाही याची कृपया वाचक रसिकांनी नोंद घ्यावी. तसेच कुठल्याही लेख व कवितेतील व्यक्ती वा प्रसंगांशी साधर्म्य आढळल्यास तो निव्वळ योगायोग समजावा.

# जिन्दा हूँ मैं – संगीता मराठे



आज मुझे अपने होने का एहसास है
जिंदा हूँ मैं, इसपे आज मुझे नाज़ है.
जिंदगी बीत गई, हाथ जोडते - प्रार्थना करते हुए
कभी अपने, कभी परायोंके मुँह मोडते, देखते हुए।
आज ये एहसास है, ये हाथ उठ भी तो सकते हैं,
अपनी रक्षा, अपनोंकी रक्षा के लिए।
अपना जुनून - अपना गुरूर सँभालने के लिये।
सोचती हूँ मैं, इतनी मुद्दत क्यूँ लगी ये समझने में ?
बचपनसेही समझाया था, बडे बड़ोंने।
बेटीयोंकी यही तो फितरत है ,
हाथ जोडे रहने में ही 'तेरी भलाई है।
कल एक बलुचि छात्राको देखा,
अपने हक़ में बोलते हुए,
बेझिझक अन्याय के खिलाफ
आवाज़ उठाते हुए।



वह आवाज़ आज भी कानोंमें गूँज रही है।
दिल को पीरोड पीरोड कर यह कह रही है,
अब बस्स। .. अब बस्स हुआ
लज्जासे, दबके रहना,
समय आ गया है अब - गर्व से सीना तानें चलना।
याद आया, रानी लक्ष्मीबाई भी तो बेटी थी।
माँ थी, रानी थी, शूर लढवैय्याँ थी।
मैं भी ये अलग़ अलग़ रूप धारण कर सकती हूँ ,
कभी दुर्गा, कभी लक्ष्मी, कभी सरस्वती कभी अप्सराभी बन सकती हूँ।



भला हो उस बलुचि छात्रा का,
जिसने फिर एक बार साबित कर दिखाया,
जब एक बेटी पैदा होती है,
जिंदगी को जिन्दा रखती है।
सचमें आज मुझे अपने होने का एहसास है,
जिन्दा हूँ मैं, इसपे आज मुझे नाज़ है।

## माझ्या मनातील तुळशीबाग – ज्योत्स्ना ओगले

तुळस म्हटली की डोळ्यापुढे येते ती सुबक तुळशी-वृंदावनात डुलणारी, भरघोस, पानापानांवर हळदी कुंकवाने माखलेली प्रसन्न तुळस. या तुळशी वृंदावनातील तुळस जर मन प्रसन्न करते, तर तुळशीबाग म्हटल्या जाणारया जागेत तर तुळशीची बनेच असायला हवीत,असे मला वाटे. वयाच्या आठव्या-नवव्या वर्षी खरेदीचे आकर्षणच जास्त. त्यामुळे झाडे बघायला किंवा तुळशीबाग या नावाच्या मागे इतिहास असू शकेल याचा विचार करण्याचे वयच नव्हते. आता जागेच्या नावामागे इतिहास असतो, एखादी दंतकथाही असते हा विचार मनात आला आणि या लेखाच्या निमित्ताने मी त्याचा पाठपुरावा केला.

माहुली गावातील एक गरीब मुलगा वणवण करत नशीब काढायला पुण्यात पोहोचला, दमून मंडई भागातील सरदार खासगीवाल्यांच्या जमीन जुमल्याचा भाग असलेल्या रामेश्वर मंदिराच्या फरशीवर झोपला. खासगीवाल्यांच्या नजरेस तो पडला. त्यांनी मंदिरासाठी व घरच्या पूजेसाठी फुले तुळशी आणण्याचे काम देऊन त्याला उपजीविकेचे साधन दिले. हा मुलगा तैल बुद्धीचा. गणितात उत्तम गती व अक्षर पण चांगले. त्याने हिशोबाची व वसुली गोळा करण्याची नवी पद्धत दाखवली. पुढे तिचा पेशवे दरबारी वापरही झाला. त्याला बढती मिळून तो पालखीपदस्थ सरदार झाला. खासगीवाल्यांनी खुश होऊन, ज्या जागेतून लहानपणी तो फुले, पाने, तुळशी आणत होता, ती जागा वतन म्हणून त्याला दिली. तो मुलगा नारो अप्पाजी खिरे आणि त्याचीच ही तुळशीबाग.

पानिपतच्या युद्धानंतर १७६१ मध्ये बांधकामास सुरुवात होऊन १७६३ मध्ये तुळशीबाग मूर्त स्वरूपात उभी राहिली. मध्यभागी राम, गणेश व शंकर यांची देवळे, शिवाय दत्त मारुती व विठ्ठल रखुमाईची देवळे. गणेश हे तर पेशव्यांचे कुलदैवत. तेव्हा पेशवे कुटुंबीय, खुद्द पेशवे व इतर पालखीपदस्थ व्यक्ती व त्यांचे कुटुंबीय देवदर्शनानिमित्त ये-जा करत. पेशवे वार्षिक समारंभानिमित्त हजेरी लावत असत. पेशवीण बाई व इतर श्रीमंत महिलांच्या मखमली जोड्यांची नाजूक खुसखुस येथील जमिनीने अनुभवलेली आहे. खरं म्हणजे तुळशीबागेच्या जमिनीला महिलांच्या पादत्राणांची जास्त सवय; कारण त्यांचाच वावर येथे जास्त. हा परिसर म्हणजेच तुळशीबाग.

सौंदर्यवर्धनाची साधने ते रोजच्या वापरातील संसारी वस्तू आणि तो संसार अद्ययावत करायच्या वस्तूही, नकली दागिन्यांपासून ते खऱ्या सोन्या-मोत्यांच्या वस्तू देखील येथे आहेत. लग्नाला उभ्या राहणाऱ्या वर-वधूंना लागणाऱ्या मुंडावळ्या, लग्नविधीत लागणारी सहाण, पूजाविधीची सामग्री, लग्नाच्या आणि इतर शुभप्रसंगाच्या, पंगतीला शोभा आणणाऱ्या तयार रंगीबेरंगी रांगोळ्या, सर्व येथे मिळते. साग्रसंगीत लग्न विधी करून संसाराला लागणारी नववधूची पहिली खरेदीची जागा म्हणजे तुळशीबाग. तीच काय, संसारात आकंठ बुडालेल्या गृहिणीही घरात भरपूर भांडी असूनही, नवीन धर्तीचे सतेले-पातेले किंवा शकुंतला किंवा तत्सम नावाच्या कुंड्यांच्या मोहात पडतात. घेतलेली भांडी पुढे अडगळीत किंवा मोडीत जाणार हे माहीत असूनही. मागच्या पिढीतील बायका भांडीकुंडी जमवत तर आधुनिक महिला नॉनस्टिक भांडी क्रोकरी आणि नवी नवी उपकरणे यांच्या शोधात सर्व ठिकाणी फिरून पुन्हा तुळशी बागेत येतात.

स्त्री कुठल्याही काळातील असली तरी एकूणच स्त्रीचे, मुले नवरा व तिसरे प्रेम संसार उपयोगी भांडीकुंडी. या प्रेमापोटीच त्या तुळशीबागेत रमतात. स्थानिक महिला तर तुळशी बागेत जातातच, पण परदेशात राहून भारत भेटीला आलेल्या महिलाही धावती भेट देतात. महिलांची ती प्रिय आणि हक्काची जागा आहे.

माझ्या मते आधुनिक मॉल संस्कृतीची पायाभरणी तुळशी बागेने केलेली आहे. जेव्हा प्रसारमाध्यमांचा सुळसुळाट नव्हता, तेव्हा देवदर्शनाबरोबर व खरेदीनिमित्त मैत्रिणी, मायलेकी एकत्र येऊन सुखदुःखाच्या गोष्टी करत, वस्तू हाताळत मन मोकळे करत. आज अजूनही तेच चालते. तुळशीबाग हे महिलांना मिळालेले वतन आहे असे म्हटले

तरी वावगे ठरणार नाही.

पुणे हे विद्येचे माहेरघर. तेव्हा विदेशी विद्यार्थ्यांची येथे भरपूर आवक जावक. शिक्षण संपवून घरी जाण्यापूर्वी ही विदेशी मंडळी तुळशीबागेत मिळणाऱ्या पितळेचे दिवे, पळया, समया, पंचामृताची कचोळे अशा वस्तू हाताळत फिरत असतात. एकूणच सर्वांची लाडकी ही जनमनाची तुळशीबाग. माझ्या तुळशीबागेच्या फेऱ्या वयाच्या सातव्या आठव्या वर्षापासून गेली वर्षे ७२ वर्षे अधूनमधून चालूच असतात. तुळशीबाग आधुनिक होऊ लागल्याची सुरुवात पाहिली होती पण संपूर्ण अद्ययावत तुळशीबाग बघण्याचा योग अजून आलेला नाही. पुढील भारत भेटीत हा योग जमवीन.

तुळशीबाग ही माझी स्वतःची गोड आठवणींची ठेव आहे. मी पुण्यात जन्मले पण वाढले मात्र मुंबईत. दिवाळी व मे महिन्यात माझी पुण्यात भेट असायची. आजोळी भरपूर लाड व्हायचे. पण खरी हौस व कौतुक माझी मावशी करायची. माझे नाव निर्मला पण मावशी मला लाडाने निमणे म्हणायची. तिच्याकडे राहायला गेल्यावर, ती मला व तिची मुलगी अचला आम्हा दोघींना दोन हातात घेऊन तुळशीबागेत न्यायची. अगोदर मधल्या भागातील सर्व देवळातील देवांचे दर्शन, प्रदक्षिणा, हे सोपस्कार मनोभावे व्हायच, मग व्हायची सुरुवात खरेदीला. लहान मुलींना भावी आयुष्यातील संसाराची गोडी लागण्यासाठी मिळणाऱ्या छोट्या भांड्याकुंड्यांचा संच ती मला घेऊन देई आणि म्हणे पुढच्या वेळी बंब, पिंप वगैरे घेऊन देईन. पण मी ती वेळ तिच्यावर आणूनच दिली नाही. मला ती गोडी लागलीच नव्हती. भांड्याकुंड्यांची खरेदी झाल्यानंतर आम्ही तिघी जणी बांगड्या, रिबिनी खरेदी करत असू. बांगड्या, रिबिनी, शिवाय आधीच लांब असलेल्या केसांसाठी रंगीबेरंगी गोंडे.

आमच्या खरेदीनंतर कधीमधी मावशी पण सोनसळी, राजवर्खी बांगड्या कासारापुढे बसून भरून घेई. हे सौभाग्य लेणे घातल्यानंतर तिच्या चेहऱ्यावर आनंद दिसे. देवदर्शन, खरेदी झाली की पाठोपाठ पोटपूजेचा प्रस्ताव पुढे येई. तुळशीबागेच्या पोट गल्लीत आमचे त्रिकूट पोहोचत असे. उसाच्या रसाच्या गुऱ्हाळात, नव्हे रसवंतीत बसून रंगीबेरंगी चित्रे बघत असताना मावशी रसवाल्याला सूचना देऊ लागे. “आले ,लिंबू भरपूर आणि बर्फही स्वच्छ धू..मुलींना बाधायला नको”. हा संवाद संपेतो गारेगार उसाचा ग्लास हातात. आमच्या तब्येतीची इतकी काळजी करणारी मावशी लगेचच आम्हाला जवळच्या कावरे कोल्ड्रिंक हाऊसमध्ये न्यायची. स्टेनलेस स्टीलच्या बैठ्या कपातून चपट्या चमच्या बरोबर येणारे आइस्क्रीमचे प्रकार ख़िलवायची. स्वतःही ते गारेगार आईस्क्रीम जिभेवर ठेवून आमच्या दोघींकडे हसत बघायची. तेथून बाहेर पडताना म्हणायची "निमणे, आली ना मजा आमच्या तुळशी बागेत? मुंबई नुसतीच मोठी पण अशी तुळशीबाग नाही तिथे." आणि मुंबईत अशी भूलभुलैया तुळशीबाग नसल्याचे मला मनापासून वाईट वाटे.

बालपण बघता बघता सरले. शिक्षण संपता संपता लग्नही झाले. सासूबाईंच्या भरल्या संसारात तुळशीबागेतील सतेली पातेलीची भर घालण्याची जरूर नव्हती. आणि ती घालणारी मी कोण?

पण ६६ साली जेव्हा मी सासरच्या भरल्या संसारातून परदेशात स्वतःचा संसार मांडायला निघाले, तेव्हा लहानपणी खेळातील भांड्याकुंड्यांची गोडी नसणारी मी, मला त्या भांड्याकुंड्यांचे महत्त्व जाणवले. नातेवाईकांनी तुला हवे ते घे म्हणून दिलेल्या पैशातून चकलीपात्र, किसणी, लाटणे अशा वस्तू घेऊन, कमी सामान न्यायच्या नियमात बसवून तुळशीबागेला कॅनडात आणल. प्रत्येक वेळी त्या वस्तू वापरताना मला माझ्या नातेवाईकांची व तुळशीबागेची आठवण येई. लहानपण ते संसारी मी, हा प्रवास डोळ्यापुढे येई. हे संसार उपयोगी सामान घेतले ते दुकान होते एन एच पंड्या यांचे. ते दुकान अजूनही तुळशी बागेत आहे. मला सामान विकले ते आजोबा केव्हाच काळाच्या पडद्याआड गेलेले आहेत. पण अजूनही तुळशीबागेत गेल्यावर माझे पाय त्या दुकानापाशी रेंगाळतात. मधली काही वर्षे भारत भेटी कमी झाल्याने तुळशी बागेत जाणे झाले नाही पण आता त्या मानाने भेटी जास्त होवू लागलया आहेत. मी पुण्यात आल्यावर माझ्या भाच्या, तरुण नातेवाईक, वहिन्या मला कॅम्पातील मॉलला जाण्याचा आग्रह करतात, मला मात्र तुळशीबागेतच

जायचे असत. त्यांना वाटत असेल, काय गावठी बाई आहे ही. मॉलच्या संस्कृतीत राहिलेल्या मला मॉलचे अप्रूप नव्हते. मला हवी होती ती तुळशीबाग, खरेदीला आणि आठवणींना उजाळा द्यायला.

शेवटी मी एकटीच निघे तुळशी बागेला भेट द्यायला. रस्त्यावरच्या वाढत्या गर्दीत आणि पादचाऱ्यांच्या आणि फेरीवाल्यांच्या गर्दीत मला तुळशीबागेत शिरायचे दारच दिसत नसे. शेवटी एकदाचे दार सापडायचे. आत गेल्यावर तुळशीबाग अद्ययावत होण्याच्या बांधकामात असलेली दिसे. बांधकामाचे सामान, मध्येच पायऱ्या व फरशांची डागडुजी चालू. त्यामुळे बरेच वर खाली करावे लागत होते. पण मनासारखी खरेदी झाल्यावर केलेली धडपड कारणी लागत असे. या वेळेपर्यंत मला दोन नाती व दोन नात सुना पण आल्या होत्या. त्या वापरतील किंवा नाही याचा विचार न करता टिकल्या कॉस्च्युम ज्वेलरी घेऊ लागले. घरची खरेदी झाल्यावर माझ्या कॅनेडियन मैत्रिणी, माझ्या वयाच्या किंवा मोठ्या ही, त्यांच्यासाठी काहीबाही घेऊ लागले. एका वेळी तर मी दोन डझन मण्याचे, खणाच्या कपड्याचे बटवेच खरेदी केले.

परत कॅनडाला आल्यावर, हे सर्व मैत्रिणींना दिल्यावर, त्यांना हे बटवे आवडून त्या सर्रास वापरू लागल्या व कौतुक करू लागल्या. मग मीही त्यांना तुळशीबाग या मॉलचे कौतुक सांगू लागले.

माझ्या मनात तुळशीबाग अजून तितकीच ताजी आहे. माझे मन त्यात गोवलेले आहे. मला व स्वतःच्या मुलीला हाताशी धरून नेणारी माझी ठेंगणी ठुसकी मावशी व तिची मुलगी दोघीही या जगात नाहीत. दोघी हातात हात घालून देवाच्या तुळशीबागेत फिरत असतील असे वाटते. तुळशीबागेत गेल्यावर त्या दोघींच्या आठवणीने डोळे पाणावतात आणि मावशीची "निमणे" ही हाक कानात रुंजी घालते. त्यांच्या स्मृतीला स्मरून, मी तुळशी बागेचे भारलेले वातावरण, परिसर मनात भरून घेऊन, आठवणींची बकुळ फुले मनात जपत तुळशीबागेत यायचा मनाशी वायदा करत, तुळशीबागेचा निरोप घेते.

पुढच्या वेळी खरेदी करायची ती नव्या पणतीसाठी. तुळशीबाग चौथ्या पिढीत नेण्यासाठी मला यायलाच हवे.

## **रुचिरा** (source: watsapp)

- वाळलेल्या मिरचीच्या बिया मोहरीसोबत फोडणीत वापराव्यात. वरणाला वेगळी चव येते. वरण खमंग होते.
- वाळलेल्या मिरचीच्या बिया, उन्हाळ्यात पापड करताना वापराव्यात. पापडाला चव छान येते.
- ढोकळ्यासाठी डाळ तांदूळ भिजवताना पाव वाटी सोयाबीन भिजत घाला. ढोकळा मऊ होतो व पौष्टिकही. तसेच दहीवड्याचं पीठ भिजवतानासुद्धा उडीद डाळीबरोबर सोयाबीन भिजत घाला व वाटून घ्या. वडा नरम होतो व पौष्टिकही.
- मठरी तयार करण्यासाठी अर्धा तास अगोदर पाण्यात ओवा टाकून ठेवायला पाहिजे. मठरीची कणीक मळताना ओवा पाण्यासकट घालावा म्हणजे मठरी तळताना ओवा तेलातून बाहेर निघणार नाही.
- लसणाची साल ताबडतोब निघण्यासाठी कपड्यावर आरारूटची पावडर घेऊन त्यावर लसूण चोळला की साल आपोआप निघते.
- पातळ भाजीची फोडणी -----यात मेथी, मोहरी, जिरे, हिग, हळद आणि आवश्यक असेल तर लसूण घालतात. तेल

तापल्यावर प्रथम मेथीचे दाणे घालावेत व थोडे गुलाबी झाल्यावर इतर पदार्थ घालावेत, त्यामुळे छान खमंग वास येतो.

- भाज्या झटपट होण्यासाठी कुकर वापरावा -- भाज्या झटपट होण्यासाठी छोट्या 2-3 लिटरचा कुकर वापरा. गवार, घेवडा, तोंडलीसारख्या सुक्या भाज्या करण्यासाठी भाजी कुकरमध्ये फोडणी द्यावी व त्यात मीठ, गूळ खोबरे घालून अर्धी वाटी पाणी घालून कुकरला 2 शिट्या काढाव्यात. अगदी 5 मिनिटांतच छान भाजी तयार होते. रस्सा भाजी व उसळी करण्यासाठी बेताचे पाणी घालावे व 3 शिट्या काढावाया. प्रेशरकुकरच्या वापरामुळे इंधन व वेळ दोन्हीची बचत होते.

- लवंगा चहा मसाल्यात वापराव्यात ----लवंग निवडून, बारीक लवंग व काड्या न फेकता, वाळवून चहाच्या मसाल्यामध्ये वाटाव्यात. तसेच वेलचीची टरफले न फेकता चांगली वाळवून चहा मसाल्यात वापराव्यात.

- आले वाळवून ठेवावे -----जास्त प्रमाणात आले असल्यास सालं काढून फेकून न देता वाळवून ठेवावीत. मसाला वाटताना वापरावीत किंवा चहामध्ये वापरावीत.

- लिंबं, संत्री दोन तास उन्हात ठेवावीत ---लिंबाचे सरबत किंवा संत्र्याचे सरबत करण्यापूर्वी लिंबं किंवा संत्री दोन ते तीन तास उन्हात ठेवावीत. किंवा गरम पाण्यात अर्धा तास ठेवावीत. रस चांगला सुटतो .

- कच्चे तेल टाकल्याने धिरडी सच्छिद्र होतात ---कोणत्याही पिठाचे धिरडे करताना त्यात कच्चे तेल टाकावे. त्यामुळे धिरडी सच्छिद्र होतात. आयत्यावेळी दोन मुठी रवा घातल्यास धिरडी कुरकुरीत होतात.

- खीर चवदार बनविण्यासाठी ---खीर बनवत असल्यास तांदूळ शिजल्यावर त्यात चिमूटभर मीठ टाकावे, असे केल्याने साखर कमी लागेल व खीर चवदार बनते.

- दही तयार करताना-----थंडीच्या दिवसात विरजण लावताना 1 चमचा कॉर्न फ्लावर दुधात मिसळून विरजण लावावे. सुंदर दही तयार होते.

- हिरव्या पालेभाज्या ताज्या ठेवण्यासाठी----- हिरव्या पालेभाज्या जास्त दिवस ताज्या रहाव्यात यासाठी फ्रिजमध्ये ठेवताना पेपरमध्ये गुंडाळून ठेवा.








## **दाने दाने पे लिखा है** ~ शशिकांत शेटे

मी: (स्वतःशी) Man is a social animal.

वा! काय छान सुरवात आहे मराठी लेखाची! इंग्रजी वाक्यानं! मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे आणि आमचे कुटुंब देखील त्याला अपवाद नाही. गेले तीन चार महिने जवळ जवळ प्रत्येक शनिवारी कुणा ना कुणाकडे चमचमीत भोजन चापून आल्यावर आम्ही ठरवतो कीं आपण देखील आता लोकांना घरी जेवायला बोलवावे.

आमची ही म्हणते: अगदी बरोबर आहे तुमचं म्हणणं.

मी: ठीक आहे तर मग ह्याच शनिवारी बोलवूया .

ती: अहो, असं लहान मुलासारखे अधीर काय होता? लोक काही तुमच्यासारखे रिकामटेकडे नसतात. त्यांचे चांगले महिना-महिन्याचे Week-ends बुक असतात.

मी: चल गं. महिना महिना वीक एंड्स बुक असायला ते काय मंत्री आहेत?

ती: मंत्री आहेत कि संत्री आहेत ते मला माहीत नाहीय. उगाच नाही ते बोलू नका.

मी: बरें, मग त्याच्या पुढच्या शनिवारी बोलावू काय? १७ मार्चला ?

ती: इतक्या लवकर पण नको गं बाई. लोक काय तुमच्या आमंत्रणाचीच नुसती वाट बघत थांबलेत असं वाटतं की काय तुम्हांला?

मी: बरं, हा २४ मार्च कसा आहे?

ती: (कालनिर्णय बघत) २४ मार्च ना? अहो त्या दिवशी मंडळाचा साहित्य संमेलनाचा कार्यक्रम आहे ना. आपण कधी नाही ती वेळेवर RSVP दिली आहे.

मी: अरे हो, विसरलोच होतो मी. साहित्य संमेलन आहे ना? तर मग, ३१ मार्चला?

ती: एक मिनिट हं. कालनिर्णय बघते.

मी: कालनिर्णय कशाला? तिथे काय मुहूर्त बघतेस जेवायला चांगला दिवस आहे की नाही म्हणून?

ती: अहो ३१ मार्चला कसें शक्य आहे? ३१ मार्चला तर 'महावीर जयंती ' आहे.

मी: बरं मग? महावीर जयंतीचा काय तुला उपवास असतो की काय?

ती: अहो तसं नाही, त्या दिवशी नाही का आपल्याला बापटांकडे बोलाविले आहे?

मी: अगं पण त्यांच्याकडे आपण आता तिसऱ्यांदा चाललो आहेत की.

ती: ते ही खरंच आहे म्हणा. बापट वहिनींना खूप हौस आहे. मला मेलीला जमतच नाही बाई.

मी: बरं मग असं करू या का - १४ एप्रिलला बोलावू.

ती: ठीक आहे. तो दिवस मोकळाच दिसतोय.

मी: अगं, जरा ती मराठी डिरेक्टरी आण पाहू.

ती: अहो त्यात हजार नांवे आहेत. त्या सर्वांना बोलवायचा विचार आहे की काय तुमचा?

मी: अजून तेवढं वेड लागायचं आहे मला. मला काय सर्वांचे फोन नंबर पाठ आहेत का?

ती: हां, आयाचितांना प्रथम फोन करावा.

(मी फोन लावतो. चार पांच रिंग झाल्या पण फोन उचलला नाही)

मी: कुणी उचलत नाही.

ती: अहो जानेवारीतच त्यांनी Call-Display घेतलाय म्हणे. मागे हळदी-कुंकूवाला भेटल्या होत्या, तेंव्हा सांगत होत्या.

मी. ए उगाच ढील देऊ नकोस.

ती: ढील नाही, Deal दिलयं 'Bell' ने. दोन फीचर्स घेतल्या की तिसरं फ्री.

मी: फ्री नसायला काय झालं? दोन फीचर्स मध्येच तिसऱ्याचे पैसे लावलेले असतात! बरें ते जाऊ दे. बाहेर गेले असतील कदाचित.

ती: ते कुठले बाहेर जातील भलत्या वेळी? नांव बघितलं असेल डिस्प्ले वर तुमचं!!

मी: बरं मग? अगं ते तर माझे चांगले मित्र आहेत.

ती: हो तर. म्हणूनच तुम्हाला चांगले ओळखतात. एकदा का तुमचा फोन लागला की निदान १५ मिनिटांची तरी निश्चिन्ती! तरी मी सांगत असते सारखी तुम्हाला की फक्त कामाचेच तेव्हढे बोला. पण नाही.

मी: अगं नुसते कामाचाचं बोलायला मी काय tele-marketer आहे?

ती: नसाल पण कुठल्याही



गोष्टीचा पाल्हाळ लावायची सवयच आहे तुम्हाला. परवा मी तुम्हाला नुसतं विचारलं कीं
'नवरा माझा नवासाचा' च्या कव्हर मध्ये VCD नाहीय, ती कुठाय? तर तुम्ही लेक्चर द्यायला सुरवात केलीत:
"तो सचिनचा सिनेमा ना? Bombay to Goa ची कॉपी पण अतिशय छान केलीय. Full to Enjoyment आणि तुला सापडत नाही? कमाल आहे! किचनमध्ये प्रत्येक वस्तू तूं जागच्या जागी ठेवतेस. मी भांडी आवरताना एखादं जरी भांडं जर्रा दुसरीकडे ठेवले गेले तरी आमच्याकडे भांड्याला भांडं लागतं! अन तुला VCD नीट ठेवता येत नाही? नाहीतर पाठकांना दिली असशील तू. एकदा का त्यांना कुठली गोष्ट दिली की मग ती विसरावीच. पांच सहा महिने नांवच नाही. शिवाय आपलीच वस्तू आपणच मागायला आपल्याला प्रशस्त वाटत नाही. .. खरंय की नाही?"
तर मी तुम्हाला पुन्हा विचारलं, 'अहो पाठक पुराण बंद करा. 'नवरा माझा नवसाचा' कुठाय ते विचारतेय मी'. तर म्हणालात एवढं ६५ किलो दिसत नाही? मग म्हणालात आठवलं. आहे जगाच्या पाठीवर - म्हणजे त्याच्या कव्हर मध्ये!
साध्या गोष्टीचं माणसाने किती रामायण करावे?
तर मी काय म्हणत होते कीं लोकांना इतका वेळ नसतो म्हणून तुमचं नुसतं नांव बघितलं तरी लोकांना धडकी भरते.
आता पुन्हां फोन करा पण निरोप ठेवण्याच्या तयारीनं.
(मी फोन लावून जेवायला येण्याबद्दल निरोप ठेवतो).
मी: हं ..अगं हे गोडबोले - त्यांना पण बोलावलं पाहिजे.
ती: हो बोलवा, बोलवा. पण मुलांना घेऊन या असं मुद्दाम सांगायची गरज नाही. घेऊन आले तर ठीकच आहे. आपल्या आशुला कुठे बोलाविले होते मागच्या खेपेस? तरी देखील आपण घेऊन गेलोच होतो की.
तर त्यांचा मुलगा चांगला अर्धा तास झाला तरी बाहेर आलाच नाही.
मी: अगं वेंधळी की काय तू. बाहेर आला नाही कारण तो बाहेरून आला - घरी नव्हताच.
ती: ते काही का असेना. मी सांगते तसंच सांगा. (मी तसा फोन करतो).
मी: बरं, आपण कामेरकरांना बोलवायचं कां?
ती: कोण? ते गाणारे? तुम्ही देखील ना! जरा कुणी गाणारे दिसले की लागलीच पाघळता बघा!
शास्त्रीय संगीतातल्या दोन-एक परीक्षा काय त्या दिल्यात, स्वतः ला एकदम नरेंद्र दातारच समजतात.
मी: पण मी काय म्हणतो - कामेरकर बरा गातो.
ती: असेल, पण इतरांना बोअर होतं त्याचा काय? दुसरा एखादा गद्य माणूस बघा ना.
मी: ठीक आहे. भटांना बोलावू या. खूप दिवस झाले.
ती: हो खरंच आहे बाई. पण ती भटीणबाई जरा शिष्टच आहे हो.
मी: ह्यॅ , तिला शिष्ट असायला काय झाले?
ती: अहो मागे मंडळाच्या कार्यक्रमाला समोरून गेली पण ओळख नसल्यासारखें तोंड वर करून बघितले पण नाही, बोलायचं तर दूरच राहू दे.
मी: अगं, तिचें लक्ष् नसेल. तू तरी बोलायचंस.
ती: मुद्दामच बोलले नाही मी. म्हटलं पाहू या आपणहून बोलते की नाही तें.
मी: तुम्हीं बायका ना.. अगदी कमाल करता!
ती: तुम्हाला हवं असेल तर बोलवा हो. मी अगदीच काही माणूसघाणी नाहीय. भटीणबाई सारखी!
मी: बरं, अजून एक नांव आठवलें.. पवार
ती: कोण? पवार? ते परवा इंडियातून आलेले? काही नको. ह्या नवीन immigrants चा बाई प्रॉब्लेमच असतो. ज्यूसमध्ये साखर घालून पितात काय, अगदी सकाळचं जेवण संध्याकाळी चालत नाही! मागे त्यांच्या पोरांनी नाही का आपले बाथरूम लॉक करून ठेवलं? आणि पुन्हा त्यांना आणायला जा सब वे वर, सोडायला पण जा! एवढं कुणी सांगितलंय? पवार चांगले असतील हो पण मी म्हणते की पवार काही कुठे पळून जात नाहीत. त्यांना चांगले सेटल होऊ दे.
मी: बरं, राहिलं. अगं वैद्य! विसरलोच बघ त्यांना.
ती: हो बाई , खरंच मी पण कशी विसरले हो? बघा ना? फार लाघवी बाई आहेत त्या. कैंव्हाही नवीन पदार्थ केला की हमखास घरी आणून देतात त्या. शिवाय India त गेल्या होत्या तर नाही का त्यांनी भाजणीचे पीठ आणून दिले आपल्यासाठी?
मी: खरें आहे. त्यांची मुलगी - नेहा - गोड आहे ना ग?

ती: हो बाई! मला पण आवडते. आशुतोष व नेहा यूथ कॅम्पला जाऊन आल्यापासून त्यांची चांगली गट्टी जमली आहे.

मी: असेल देवाजीच्या मना... असो. अजून कोण? हं, ते नागपूरचे काटदरे?

ती: अहो मिसेस काटदरे फार Health conscious आहेत हं . पोळी आणि भाताला हात पण लावत नाहीत त्या. नुसत्या भाज्या खातात. त्यांची फिगर पण बरी आहे तशी.

मी: त्रिकोण!

ती: काय?? काय म्हणालात?

मी: काही नाही. तुमचं सर्व Healthy Food मला तर Sick करतं . नसते चोंचले !

ती: ते जाऊ द्या हो. पण असे कसे तुम्ही काटदऱ्याना बोलविता?

मी: का? काय झालं?

ती: स्वतःला फार शहाणे समजता ना? बायकोला पण अक्कल असते हे तुमच्या कधी लक्षांत येणार?

मी: तेवढी अक्कल नाही ना मला. सगळी तुलाच दिली ना!

ती: काही जरूर नव्हती तुमच्याकडून घेण्याची. मी मुळातच हुशार आहे. मॅट्रिकला फर्स्ट क्लास मिळवलाय म्हटलं. ते असो. अहो, तुमच्या लक्षांत कसें येत नाही? आपण गोडबोल्यांना बोलाविलाय ना? अहो, काटदरे त्यांच्या बरोबर जात नाहीत.

मी: जात नाहीत? म्हणजे कुठे जात नाहीत? मॉन्ट्रिअलला?

ती: खुळे कि काय तुम्ही? अहो, त्या दोघात आडवा विस्तु जात नाही. उगीच आपल्याला ताप नको म्हणतेय मी.

मी: अं ... ठीक. त्या ऐवजी ...चौधरींना बोलवू या.

ती: चौधरी? अहो मागे त्यांना फोन वर मेसेज ठेवला होता पण त्यांनी अजून return नाही केला. ही काय पद्धत झाली वागायची?

मी: अगं विसरले असतील ते.

ती: डोंबल विसरले असतील. दिवाळीच्या कार्यक्रमाला ते येणार नाहीत म्हणून त्यांची Telephone Directory मी आणली. तर लागलीच वीकएंड ची वाट न बघता दुसऱ्याच दिवशी फोन करून येऊन घेऊन पण गेले. जसं काही सोनं लागलाय ह्यांच्या डिरेक्टरीला!! ते नाही विसरले ते??

मी: जाऊ दे गं. त्या जागी तू असतीस तर तू देखील असेंच केलं असतं.
पण एवढ्या लोकांना बसायला जागा पुरेल का आपल्याकडे?

ती: कशात काय आणि फाटक्यात पाय. अजून कोणी 'हो-नाही' पण म्हटलं नाही.

मी: (चौधरींना फोन लावतो} हॅलो , हॅलो कोण चौधरी कां? मी किशोर बोलतोय. म्हटलं तुम्हाला आमच्याकडे १४ एप्रिलला ..... एक मिनिट हं , फक्त एकच मिनिट, दुसरा एक फोन येतोय. हॅलो, कोण ? देसाई?

ती: अग्गोबाई मी विसरलेच देसायांचा दुसऱ्यांदा फोन. फोन ठेऊन द्या.

मी: अहो चौधरी, नंतर फोन करतो हं. (मी दोन्ही फोन Disconnect करतो)

ती: सांगायला विसरलेच देसायाबद्दल. अहो नाशिकला असतांना आपल्या शेजारी पारेख रहात होते ना? ते येथे कॅनडात शिफ्ट झाल्यावर त्यांच्या मिसेसचे आई-वडील visit साठी आले आहेत आणि ते एप्रिल एन्डला परत जाणार आहेत भारतात. म्हणून त्यांनी १४ एप्रिलला नाशिककरांचे एक Get-Together ठेवले आहे.

मी: अगं पण आपण १४ एप्रिललाच बोलवितो आहे ना?

ती: अहो असं काय करता? ते देसाई का पुन्हा पुन्हा येणार आहेत? आता सर्वांना कळवा - बेत बदललांय म्हणून.

मी: हो, बेत केलाच होता कुठे बदलायला? किती इच्छा होती सर्वांना बोलवायची... पण नाइलाजाला इलाज नाही दाने दाने पे लिखा है खानेवाले का नाम! हेच खरं .

## शब्द् - Trushna Parte

शब्दांची माया ममता मोहविते मज
शब्द काय आहे तेच सांगते आज

शब्दच मारी शब्दच तारी शब्द उद्धारी जगासही

जीवनाच्या छाया-प्रकाशात शब्दच मग लपंडाव **खेळवी**
आयुष्याच्या रडगाण्यात शब्दच माझे शस्त्र **होई**

कठिण समय येता कोण कामास येई
**पण** धीर देण्या **अंती** शब्दची माझा सखा होई


शब्द रचुनी केली कविता नाही मोठी साहित्यिक मी शब्दच
देई दृष्टी मजला शब्द रुपी शृंगाराची

शब्दांची विणली माळ का आवडली तुम्हांसही
शब्द रुपी सुमने तुम्ही घ्या त्यांचा सुवासही

कारण शब्दांविना जगणे नाही शब्दांविना मरणेही नाही
शब्दच **नसतील** तर जगण्याचे सुखही नाही अन मरणाचे
दु:ख:ही नाही

शब्दांच्या ओघात वाहुनी गाठेन मोठ्या सागरास मी
आहे आत्मानंद याचा की **जीवन** माझे शब्दरुपी
आहे आत्मानंद याचा की **जीवन** माझे शब्दरुपी




## ऐकावं ते नवलंच गड्या

ऐकावं ते नवलंच गड्या
मलापण आत्ताच माल़ूम पड्या
लांब थितं Canada च्या देशात म्हनं
म्हराठी लोकंबी रहात्यात म्हनं
आपलीच भाषा बोलत्यात जणू
नि आपल्याचवा**नी** रहात्यात म्हनं
लई मोठ्ठ तळं आसतया म्हनं
भरपूर पानी बी आसतया म्हनं
पेयाला भरपूर रोज रोज आंगुळ
पन संडासला कागुद लागतोय म्हनं
न्हायला वाडी फिरायला गाडी
कवाबी पेट्रोल मिलतय म्हनं
कमवाय बॉडी झिजवाय जाडी
जिम ला चकरा मारत्यात म्हनं
Canadian दयाळू दानशूर म्हनं
जगभर पैका धाडत्यात म्हनं
बर्फाला थंडीला डरत न्हाईत म्हनं
पायदळी मीठ तुडवत्यात म्हनं
सम्दीच tax भरत्यात म्हनं
पोलीस बी कामच करत्यात म्हनं
सरकार बी चांगलं आसतया म्हनं
हप्त्याची भानगड नसतीया म्हनं
म्हराटी संस्कृती हाय थितं म्हनं
द्येवाची पूजाबी करत्यात म्हनं
गणपती दिवा**ळी**ला जमत्यात म्हनं
नवरातीला गरबा करत्यात म्हनं
थितंबी लग्न होत्यात म्हनं
काळा गोरा हिंदी सिंधी आसतोया म्हनं
लगीन मातुर झोकात करत्यात म्हनं
लग्नात भांगडाच करत्यात म्हनं
किर्केट बिर्केट खेळत्यात म्हनं
जमून वर्ल्ड कप बघत्यात म्हनं
मंडळ फिंडळ आसतंय गड्या
५० वर्स झाली येड्या
ऐकावं ते नवलंच गड्या
मलापण आत्ताच माल़ूम पडया

## ठाऊक नाही - Trushna Parte

ठाऊक नाही आज असे काय वेगळे घडले
पण्, आज तुझ्या प्रेमात मी पुन्हा नव्याने पडले

कित्येक वर्षांचा सहवास तुझा पण आज भासला नवा नवा
कुणास ठाऊक भास हा का वाटे हवा हवा

उगाचच लाजणं उगाचच हसणं पुन्हा अनुभवले नव्याने
आठवणींचे सापत्नग कित्येक उधळले मनाने

कित्येक ऊन- पावसाळे आपण सोबतीने पाहिले
आयुष्यातल्या चढ-उतारांचे ओझे किती सहज वाहिले

खूप काही आठवतेय मनात सारे दडलेले
आठवतोय तो क्षण जेव्हा पहिल्यांदा प्रेमात पडलेले

समुद्रकिनारी तुझ्यासोबत घालवलेले कित्येक क्षण्
तुझ्याच एका भेटीसाठी आतुरलेले वेडे मन्

सारं काही डोळ्यांसमोर आज येऊन उभे राहिले
आणि मी मला तुझ्या स्वप्नात पुन्हा रंगलेले पाहिले

सप्तपदीने सुरु केलेला प्रवास आज सात वर्षं तुझ्या सोबत चालले
तुझी होऊन जगताना खरंच मी न माझी राहिले

ठाऊक नाही तुला कदाचित वाटेल हा वेडेपणा
पण आज नव्याने कळले माझे आयुष्य अधुरे तुझ्याविना


खरच ठाऊक नाही आज असे काय वेगळे घडले
पण आज तुझ्या प्रेमात मी पुन्हा नव्याने पडले
खरंच आज तुझ्या प्रेमात मी पुन्हा नव्याने पडले



## आजीबाईचा बटवा

खोकून खोकून कोरडा झाला जर का घसा।
मधातून चाटा हळद, ज्येष्ठमध आणि अडुळसा।।
लागला मुका मार, सुजून पाय झाला असेल गारद।
लेपासाठी उगाळा तुरटी, रक्त चंदन, आंबेहळद।।
कोंड्याचा झाला आहे कां डोक्यामधे साठा?
केस धुतांना लावा मेंदी, शिकेकाई, रिठा।।
सकाळी सकाळी उठा देवाला करा तुम्ही वंदन।
उन्हाळ्यात थंडाव्यासाठी कपाळी लावा चंदन।।
उन्हामधे रापून चेहरा झाला कां सावळा गडद?
कांती उजळण्यासाठी दुधातून प्या थोडी हळद।।
बारीक आहे कुडी म्हणून होऊं नको तू बावरी।
दूध आणि साखरेबरोबर खा थोडी शतावरी।।
पिकला एक केस होईल डोक्यावर चांदी।
नैसर्गिक रंग आहे, केसांना लावा मेंदी।।
केसांना लावा कचूर सुगंधी, मेंदी, जास्वंद।
केस होतील लांब सडक, सुगंध दरवळेल मंद ।।
गाणं म्हणण्यासाठी झालां आहांत तुम्ही अधीर।
गोड मधुर आवाजासाठी खा ज्येष्ठमध, शंगीर।।
अशक्तपणामुळे तुमचा दुखतो आहे का सांधा?
शक्तीसाठी गायीच्या दुधातून प्या अश्वगंधा।।
पित्तप्रकोप झाला आहे, पोटातून येत आहेत कां कळा?
पोटात घ्या आवळा, हिरडा, बेहडा म्हणजेच त्रिफळा।।
वातामुळे पोटामध्ये होत आहेत कां वेदना?
खा ओवा, सैंधव मीठ, आलं, लिंबू पुदिना।।
संगणकावर काम करून थकली आहे कां नजर?
डोळ्यांसाठी खावे चांगले पपई आणि गाजर।।
लहान वयामध्येच ढोल मटोल झाला कां तुमचा बेटा?
जाडी कमी करण्यासाठी जरा कमी खा बटाटा।।
धूर धूळ प्रदूषणाचा झाला आहे आता कळस।
शुद्ध हवेसाठी झाडे लावा कडूनिंब आणि तुळस।।
छोटे छोटे आजार, बरं कां, घरच्या घरीच हटवा।
प्रत्येकाच्या घरी असूद्या आजीबाईचा बटवा।।

## भारुड क्रिकेटचे - राजू कोन्नूर



अग गग गग , विकेट पडली, देवा रे देवा विकेट पडली [२]
विकेट पडली विकेट पडली विकेट पडली हो.
पाकबरोबर match चालली, match चालली, match चालली.
पाकिस्तानला batting मिळाली
(change) बुमराहची bowling पडेचिना, पंडयाला दांडी दिसेचिना
अन आश्विन चा बॉल वळेचिना, धावांचा ओघ मुळी थांबेचिना
जेंव्हा ५० षटके संपली तेंव्हा सर्वांनी सुटकेचा निश्वास टाकला
जरी धावांची रास रचली होती., तरीपण जिंकण्याचा निर्धार केला.
बोला हर हर महादेव, बोला सत श्री अकाल, बोला किसन भगवान कि जय.
भारताची batting सुरु झाली
रोहितच्या bat ला ball लागेचिना, धवनला फटक्यांचा मोह आवरेचिना
आणि तेवढ्यात काय झालं विराटची ही विकेट पडली
आणि मग काय अहो विकेट पडली विकेट पडली, विकेट पडली
अग गग गग , विकेट पडली, देवा रे देवा विकेट पडली
विकेट पडली विकेट पडली विकेट पडली हो.



सामना हरताच साहेब हसले, शेख हसले, मंत्री हसले
सर्वांचेच वाटे व्यवस्थित पोचले खेळाडूही आणखी धनिक जाहले
जेहेत्ते काळाचे ठायी भारत सामना हरला, गर्तेत पडलेला पाकिस्तान जिंकला.
बोला नगद नारायण कि जय. बोला जय जय प्रेक्षक समर्थ.
करा टाळ्यांचा कडकडाट करा. बोला पुंडलिक वरदा हारी विठ्ठल
मंडळी कळलं का कोणाची विकेट पडली ?
अहो तुमची विकेट पडली, तुमची विकेट पडली आणि तुमचीही विकेट पडली
अग गग गग , विकेट पडली, देवा रे देवा विकेट पडली
विकेट पडली विकेट पडली विकेट पडली हो.
क्रिकेटचा शोक अति दारूण, अनेकांच्या वैफल्याचे कारण
नंतर झाली दणादण, असे हे गंभीर प्रकरण,
मांडिले हे राजकारण, सांगतो मी सत्य, नारायण
बोध घ्या हो यातून रसिका, यावरी पैसा खर्चू नका
या खेळावरी हाची उतारा, उत्कर्षासाठी.
( नमस्कार).





# पसायदान

**आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें । तोषोनि मज द्यावे । पसायदान हें ॥ १ ॥**

- या विश्वात्मक (विश्वाच्या कणा कणांमध्ये भरून राहिलेल्या ) माझ्या भगवंता, माझ्या वाणीचा यज्ञ तुझ्या कृपेमुळे अखंड चालू आहे. त्या यज्ञाला आपण प्रसन्न व्हावे आणि मला हे प्रसादाचे दान दयावे.

**जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो । भूतां परस्परे पडो । मैत्र जीवांचे ॥ २ ॥**

- मग ऐक माझे मागणे. या जगामध्ये जे काही वाईट प्रवृत्ती चे लोक आहेत त्यांच्या चा नाश कर. कारण कुठलाही मनुष्य हा कधी वाईट नसतो त्याचे गुण वाईट असू शकतात. तू फक्त तेच काढून टाक आणि दुष्प्रवृत्ती काढून टाकल्यावर त्यांच्या सत्कर्मामध्ये वाढ कर. हे जर केलेस तर नक्कीच या पृथ्वीतलावरील सर्व जीव प्रेममय होऊन जातील.

**दुरितांचे तिमिर जावो । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांच्छिल तो तें लाहो । प्राणिजात ॥ ३ ॥**



- जगामध्ये पाप हे फक्त अज्ञानरूपी अंधारामुळे आहे. हा अंधार नाहीसा होण्यासाठी जगात स्वधर्मरुपी सूर्याचा उदय होवो. प्राणीमत्रांच्या मंगल इच्छा पूर्ण होवोत.

**वर्षत सकळमंगळी । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूमंडळी । भेटतु भूतां ॥ ४ ॥**

- या विश्वामध्ये ईश्वरनिष्ठ लोकांची सदैव उत्पत्ती होत राहो. धन संपत्तीलाच "सुख" मानणारे लोक नकोत तर आत्म्याचे चिरंतन सुख मागणारे लोक जन्मास यावेत.

**चला कल्पतरुंचे आरव । चेतना चिंतामणीचें गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ॥ ५ ॥**

-ईश्वरनिष्ठ लोक म्हणजेच संत हे कल्पतरूंचे उदयान आहेत, चेतानारूपी चिंतामणी रुपी गाव आहेत, त्यांची वाणी म्हणजे जणू अमृताचे समुद्रच आहेत. कल्पतरू किंवा चिंतामणी म्हणजे जे मन इच्छील त्याची पूर्तता करणाऱ्या गोष्टी. जर ईश्वरनिष्ठ लोकांशी संग ठेवला तर आपल्याला काहीच कमी पडणार नाही असा या ओवीचा मतितार्थ.

**चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ॥ ६ ॥**

- जो मनुष्य, चारित्र्यावर कोणताही डाग नसलेला चंद्रच आहे (अंधारामध्ये सुद्धा दुसर्याला साथ देणारा) आणि रागीट स्वभाव नसणारा ज्ञानरूपी प्रकाशाचा सूर्यच आहे. त्याला सदैव सज्जन लोकांचाच संग मिळतो व त्याचे सोयरे ही अगदी त्याच्यासारखेच होतात.

**किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं । भजिजो आदिपुरुखीं । अखंडित ॥ ७ ॥**

- विश्वामध्ये (तिन्ही लोकातील) लोक सर्वसुखी होऊन अखंड या आदिपुरुषाची भक्ती करत राहोत. तसे पाहता सर्व सुख मिळाल्यानंतर भगवंत भक्तीकडे जाण्याचा लोकांची इच्छा कमी होत जाते. आणि ते न होण्याची मागणी माउली करतात.

**आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं इयें । दृष्टादृष्ट विजयें। हो आवें जी ॥ ८ ॥**

- आद्य भगवंताने जे वेद आणि ग्रंथांची निर्मिती केली आहे, त्या ग्रंथांचा अभ्यास हेच लोकांच्या जीवनाचे लक्ष व्हावे. आणि त्याच ग्रंथांमध्ये दिलेल्या मार्गदर्शनानुसार आयुष्य व्यतीत करावे.

**येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दानपसावो । येणे वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥ ९ ॥**

- हे विश्वेशराया... हे जगाच्या मायबापा बापा... तू जेव्हा म्हणशील ना कि हे दान दिले.....तेव्हा हा ज्ञानदेव चिरंतन सुखी होईल.